# जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी: ०२४५२-२२७२०१ (जिल्हा परिषद निवडणूक) e-maildcgparbhani@gmail.com

क्र.२०२६/सा.प्र./जिपपंसनि/प्र.क्र.१८ दिनांक - ३१ जानेवारी, २०२६

## सुधारित निवडणूक कार्यक्रमाची अधिसूचना

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडून दिनांक १३/०१/२०२६ रोजीच्या आदेशानुसार राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. सदर निवडणूक कार्यक्रमात परभणी जिल्हा परिषद व त्या अंतर्गत असलेल्या नऊ पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झालेला आहे. सदर निवडणूक कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनी दिनांक १६/०१/२०२६ रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिध्द केली होती. त्यानुसार परभणी जिल्हा परिषद व त्या अंतर्गत असलेल्या नऊ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी दिनांक २७/०१/२०२६ रोजी उमेदवारी मागे घेणे आणि चिन्ह वाटपानंतर निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आली असून मतदान, मतमोजणी व निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करणे हे टप्पे शिल्लक आहेत.

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी त्यांचे आदेश क्र.रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४८/का.७, दिनांक २९/०१/२०२६ अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या उर्वरित टप्प्यातील शिल्लक राहिलेल्या मतदान, मतमोजणी व निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी सुधारित कार्यक्रम दिला असून त्यानुसार निवडणुकीचे पुढील टप्पे खालील प्रमाणे राहतील.

**परभणी जिल्हा परिषद व त्या अंतर्गत असलेल्या नऊ पंचायत समित्यांच्या**
**सार्वत्रिक निवडणुकीसाठीचा सुधारित कार्यक्रम**

| अ.क्र. | कार्यक्रमाचा तपशिल | कार्यक्रमाचा दिनांक |
|---|---|---|
| १. | मतदानाची तारीख | दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२६ (शनिवार) (सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत) |
| २. | मतमोजणी तारीख | दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२६ (सोमवार) (सकाळी १०.०० पासून) |
| ३. | निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात प्रसिध्द करणे | दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ (बुधवार) पर्यंत |

मतमोजणीची ठिकाणे यापूर्वी दिनांक १६/०१/२०२६ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे राहतील.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी परभणी- ४३१४०१

(संजयसिंह चव्हाण) भा.प्र.से.
जिल्हाधिकारी, तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी, परभणी

महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी: ०२४५२-२२७२०१ (ग्राम पंचायत निवडणूक) e-maildcgparbhani@gmail.com

क्र.२०२६/सा.प्र./जिपपंसनि/प्र.क्र.१८ दिनांक - ३० जानेवारी, २०२६

**अतिमहत्वाचे / निवडणूक तात्काळ**

**प्रति,**

१. सर्व निवडणूक निर्णय अधिकारी,
२. सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी,
जिल्हा परिषद पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम-२०२६
(परभणी/सेलू/जिंतूर/पाथरी/मानवत/सोनपेठ/गंगाखेड/पालम/पूर्णा)
३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)जिल्हा परिषद, परभणी
४. गट विकास अधिकारी, परभणी, सेलू, जिंतूर,पाथरी,मानवत, सोनपेठ, गंगाखेड, पालम, पूर्णा

**विषय** – जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम-२०२६
निवडणुकीची अधिसूचना नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणे बाबत.

**संदर्भ** - मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र दिनांक २९ जानेवारी, २०२६

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ अनुषंगाने सुधारित निवडणूक कार्यक्रमाची प्रसिध्द करावयाची अधिसूचना नमुना-१ यासोबत पाठविण्यात येत आहे. सदर अधिसूचना दिनांक ३१/०१/२०२६ रोजी आपल्या कार्यालयातील नोटीस बोर्डावर, आपल्या अधिनस्त सर्व गावांमध्ये प्रसिध्द करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जि. प., परभणी यांनी नोटीस बोर्डावर तसेच जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर सदर अधिसूचना प्रसिध्द करावी.

**सोबत- वरील प्रमाणे.**

**(संजयसिंह चव्हाण) भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, परभणी**

**प्रत,**

१. जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, वरील प्रमाणे सुधारित निवडणूक कार्यक्रमाची अधिसूचना नमुना-१ यासोबत देण्यात येत असून त्याची प्रसिध्दी परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेत स्थळावर करण्यात यावी.
२. जिल्हाधिकारी कार्यालय, परभणीच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.